Revenue Dept NOC.

(95)

शासन ज्ञापन क्र. : जमीन १६११/४०१/प्र.क्र.१५९/ज-२
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : १३ फेब्रुवारी,२०१२

विषय : जमीन - मुंबई उपनगर जिल्हा
मौजे- आकुर्ली, ता.बोरीवली, न.भू.क्र. १४४/१ पैकी पश्चिम हायवे जवळ, कांदिवली (पूर्व) येथील मोकळ्या जागेवर ४०X४० फूट ('व्ही ' आकाराचा) जाहिरात फलक उभारण्यास मे. महाकाय आउटडोअर मिडीया प्रा.लि. यांना परवानगी देण्याबाबत.

शासन ज्ञापन : जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांना त्यांचे पत्र क्र.सी/कार्या-३डी/कावि-५५/२०१०, दि.३० जून,२०११ ला अनुलक्षून विज्ञप्तीपूर्वक कळविण्यात येते की, मौ- आकुर्ली, ता.बोरीवली, न.भू.क्र.१४४/१ पैकी पश्चिम हायवे जवळ कांदिवली (पूर्व) येथील मोकळ्या जमिनीमध्ये ४०X४० फूट ('व्ही ' आकाराचा) एक जाहिरात फलक उभारण्यास मे. महाकाय आउटडोअर मिडीया प्रा.लि. यांना महाराष्ट्र जमिन महसूल (सरकारी जमीन वितरण) नियम १९७१ मधील नियम ३४ मधील तरतुदीनुसार तसेच शासन निर्णय क्र.एलबीएल-२५८६/१५३६२९/प्र.क्र.२००/ग-८, दि.३.२.१९८८ मध्ये दिलेल्या तरतुदीनुसार जाहिरात फलकासाठी लागणाऱ्या जमीनीकरीता प्रचलित भाडेपट्ट्याच्या प्रचलित मुल्यांकनाच्या चारपट इतकी अनुज्ञप्ती फी आकारून शासकीय जमिनीवर जाहिरात फलक उभारण्यास परवानगी देण्याबाबत शासनाच्या विचाराधीन असलेले सुधारीत धोरण निश्चित होईपर्यंत किंवा १ वर्ष यापैकी जे अगोदर होईल तोपर्यंत खालील अटी व शर्तीवर जिल्हाधिकारी यांना योग्य वाटतील अशा इतर अटी व शर्तीवर परवानगी देण्यात येत आहे :-

अटी व शर्ती:-

(१) भाडेपट्ट्याची अनुज्ञप्ती फी दर वर्षाच्या सुरुवातीस आगाऊ रक्कम म्हणून वसूल करण्यात यावी.

(२) प्रतिभूती ठेव (सिक्युरिटी डिपॉझिट) म्हणून एक वर्षाची अनुज्ञप्ती फी आगाऊ वसूल करण्यात यावी. मात्र त्यावर अनुज्ञप्ती धारकास व्याज देय राहणार नाही.

(३) जागेचा वापर मंजूर प्रयोजनासाठी करण्यात यावा. मंजूर प्रयोजनाव्यतिरिक्त जागेचा वापर करता येणार नाही.

(४) शासकीय जमिनीवर जाहिरात फलक लावण्यासंदर्भात निश्चित होणारे धोरण वरील संस्थेस बंधनकारक राहील. त्याबाबतचे हमीपत्र रु.२००/- च्या बंधपत्रावर जिल्हाधिकारी यांनी प्रत्येक संस्थेकडून घ्यावे.



Scanned by CamScanner

(५) जाहिरात फलक लावण्यापूर्वी तटीय क्षेत्र नियमांचे उल्लंघन होणार नाही. याकरीता संबंधित प्राधिकरणांची पूर्व परवानगी घेण्यात यावी. त्याचप्रमाणे बृहन्मुंबई महानगरपालिका, वाहतुक पोलीस तसेच इतर आवश्यक त्या प्राधिकरणांची परवानगी घेण्यात यावी व अशी परवानगी प्राप्त झाल्यानंतरच जाहिरात फलक उभारणीस मंजूर देण्याबाबतचे आदेश जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी निर्गमित करावेत.

अर्जदार कंपनीस वरील सर्व परवानग्या मिळविण्यासाठी आवश्यक असलेले "ना हरकत प्रमाणपत्र" जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी द्यावे.

(६) प्रश्नाधिन जमीनीची मालकी शासनाची राहील त्यावर अनुज्ञप्ती धारकाचा कोणत्याही प्रकारचा अधिकार राहणार नाही. तसेच शासनाच्या पूर्व परवानगी शिवाय जमीन विक्री/हस्तांतरण करता येणार नाही अथवा तारण ठेवता येणार नाही.

(७) वरील सर्व अटी बंधनकारक असल्याबाबत भाडेपट्टेदाराने रु.२००/- इतक्या मुद्रांक पेपरवर हमीपत्र द्यावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( वै. भू. लटके )
अवर सचिव
महसूल व वन विभाग

प्रति,

जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा,
प्रशासकीय इमारत, १० वा मजला,
वांद्रे (पूर्व), मुंबई -४०००५१

प्रतिलिपी :-

१) विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई
२) मे.महाकाय आऊटडोअर मिडीया प्रा.लि. ब-३०५, सिध्दी को.ऑप.हौ.सो., इस्टर्न एक्सप्रेस हायवे, मुलुंड (पूर्व), मुंबई-४०० ०८१
३) ज-३ कार्यासन (निवडनस्ती) महसूल व वन विभाग



Scanned by CamScanner

(1.०U)

(141)

# जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा

क्र. :-सी/कार्या-३डी/कावि-७७/२०१२.आ.क्र. २६७
दिनांक : E 2 FEB 2013 /०२/२०१३

**वाचले :-**

१) शासन महसूल व वन विभागाकडील ज्ञापन क्र.जमीन २६११/४२१/प्र.क्र.१५९/ज-३ दि.२३/०२/२०१२.
२) या कार्यालयाचे पत्र क्र.सी/कार्या-३डी/कावि-७७/२०११ दि. २१/०३/२०१२.
३) मे.महाकाय आऊटडोअर मेडिया प्रा.लि. यांचे दि.०४/१०/२०१२ चे पत्र.
४) अनुज्ञापन अधिक्षक (प्र.), बृहन्मुंबई महानगरपालिका यांचे ना-हरकत पत्र क्र.अअ/७२६७/जाहिरात दि.२४/०७/२०१२.
५) महाराष्ट्र तटीय क्षेत्र प्राधिकरण अधिकारी यांचे पत्र क्र.CRZ-२०११/CR-३६/TC-३ दि.०१/१०/२०१२.
६) सह.आयुक्त वहातूक पोलीस मुंबई यांचे पत्र क्र.TPHQ/Plg/HRD११८/F.No.४५/illumination of Hording/Kandivali Tr.Dvn./६६/२०१२ दि.११/१२/२०१२.

**आदेश :-**

मौजे आकुर्ली, तालुका बोरीवली, न.भू.क्र.१४४/१ पैकी पश्चिम हायवे जवळ कांदिवली (पूर्व) येथील मोकळया जमिनीमध्ये ४० फुट X ४० फुट ( व्ही आकाराचा) एक जाहिरात फलक उभारण्यास मे. महाकाय आऊटडोअर मिडीया प्रा.लि. यांना महाराष्ट्र जमीन महसूल ( सरकारी जमीन वितरण) नियम १९७१ मधील नियम ३४ मधील तरतुदींनुसार तसेच शासन निर्णय क्र.एलबीएस-२५८६/१७३६२९/प्र.क्र.२००/ग-८/ दि.३/०२/१९८८ मधील तरतुदीनुसार जाहिरात फलकासाठी लागणा-या जमिनीकरीता प्रचलित भाडेपट्ट्याच्या प्रचलित मुल्यांकनाच्या चारपट इतकी अनुज्ञप्ती फी आकारुन शासकीय जमिनीवर जाहिरात फलक उभारण्यास परवानगी देण्याबाबत शासनाच्या विचाराधीन असलेले सुधारीत धोरण निश्चित होईपर्यंत किंवा १ वर्ष यापैकी जे अगोदर होईल तोपर्यंत शासन अटी व शर्तीवर तसेच जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांना योग्य वाटतील अशा इतर अटी व शर्तीवर परवानगी दिलेली आहे.

शासन महसूल व वन विभाग यांनी दि.२३/०२/२०१२ चे ज्ञापनात नमुद केल्यानुसार जाहिरात फलक लावण्यापूर्वी तटीय क्षेत्र नियमांचे उल्लंघन होणार नाही, याबाबत संबंधित प्राधिकरणांची पूर्व परवानगी घेण्यात यावी. त्याचप्रमाणे बृहन्मुंबई महानगरपालिका व वाहतुक पोलीस तसेच अन्य आवश्यक त्या प्राधिकरणांची परवानगी प्राप्त झाल्यानंतर जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांनी शासनाने दिलेल्या परवनगीनुसार अटी व शर्तीवर जाहिरात फलक उभारण्यास परवानगी दयावी असे निर्देशीत केल्यानुसार या कार्यालतयाने उपोद्घातातील अनुक्रमांक २ चे पत्रानुसार मे. महाकाय आऊटडोअर मिडीया प्रा.लि. यांना पत्र देवून उक्त नमुद आवश्यकत्या परवानग्या सादर करण्यास कळविले होते. त्यायनुसार मे. महाकाय

जिल्हाधिकारी,मुंबई उपनगर यांचे कार्यालय,प्रशासकिय इमारत १०वा मजला,शासकियवसाहत,बांद्रा(पूर्व)मुंबई ५१
कार्यालय९१-२६५५६७९९/२६५५७८०७फॅक्स २६५५६८०५ इमेल mumbaisuburbancollector@mah.gov.in


Scanned by CamScanner

आऊटडोअर मिडीया प्रा.लि. यांनी दिनांक ०४/१०/२०१२ चे पत्राने महाराष्ट्र तटीय क्षेत्र नियमन प्राधिकार, बृहन्मुंबई महानगरपालिका यांची आवश्यकती परवानग्या सादर केल्या आहेत.

सबब, उपोद्घातातील अनु. क्र.१ चे आदेशास अधिन राहून मौजे आकुर्ली, तालुका बोरिवली, न.भू.क्र.१४४/१ पैकी पश्चिम हायवे जवळ कांदिवली (पूर्व) येथील मोकळ्या जमिनीमध्ये ४० फूट X ४० फूट ( क्यो आकाराचा) एक जाहिरात फलक उभारण्यास मे. महाकाय आऊटडोअर मिडीया प्रा.लि. यांना खालील अटी व शर्तींवर परवानगी देण्यात येत आहे.

**अटी / शर्ती :**

१) एक जाहिरात फलक लावण्याकरीता १४.८६ चौ.मी. क्षेत्राकरीता जमीनीच्या प्रचलित भाडेपट्ट्याच्या प्रचलित मुल्यांकनाच्या ४ पट इतकी वार्षिक अनुज्ञप्ती फी ची रक्कम रु.३,०१,४१२/- अधिक प्रतिभूती ठेव (सिक्युरिटी डिपॉझिट) म्हणून एक वर्षाची अनुज्ञप्ती फी रक्कम रु.३,०१,४१२/- अशी एकुण रक्कम रु.६,०२,८२४/- पे-ऑर्डर द्वारे Collector, Mumbai Suburban District यांचे नांवे काढून सात दिवसात या कार्यालयात जमा करावी.

२) भाडेपट्ट्याची अनुज्ञप्ती फी दर वर्षाच्या सुरुवातीस आगाऊ रक्कम म्हणून या कार्यालयात जमा करावी.

३) मंजूर जागेचा वापर मंजूर प्रयोजनासाठीच करण्यात यावा. मंजूर प्रयोजनाव्यतिरिक्त जागेचा वापर करण्यात येवू नये.

४) जाहिरात फलक लावण्यास मंजूर जागेवर जाहिरात फलक लावण्यापूर्वी तटीय क्षेत्र नियमांचे उल्लंघन होणार नाही या बाबत संबंधित प्राधिकरणाची पूर्व परवानगी घ्यावी. त्याचप्रमाणे बृहन्मुंबई महानगरपालिका तसेच वाहतूक पोलीस व अन्य आवश्यक त्या प्राधिकरणांची परवानगी घेण्यात यावी.

५) जाहिरात फलक लावण्याकरीता परवानगी दिलेल्या जमिनीची मालकी शासनाची राहील त्यावर अनुज्ञप्ती धारकाचा कोणत्याही प्रकारचा अधिकार राहणार नाही.

६) जाहिरात फलक लावण्याकरीता परवानगी दिलेली जमीन शासनाच्या पूर्व परवानगी शिवाय ती जमीन विक्री / हस्तांतर करता येणार नाही अथवा तारण ठेवता येणार नाही.

७) जाहिरात फलक उभारतांना बृहन्मुंबई महानगर पालिकेच्या नविन मार्गदर्शक तत्वे-२००८ प्रमाणे जाहिरात फलकाचा आकार व जाहिरात फलकांची संख्या याकरीता बृहन्मुंबई महानगर पालिकेची परवानगी घेऊन त्यांचे पालन करणे आपणांस बंधनकारक राहील.

८) शासकीय जमिनीवरील जाहिरात फलकांसाठी अशा जमिनीसाठी प्रचलित दराने, अनुज्ञप्ती फी आकारण्यात येईल. तथापि, अनुज्ञप्तीच्या प्रचलित दरामध्ये वाढ करण्याचा शासनाने निर्णय



Scanned by CamScanner

घेतल्यास जाहिरात फलकाच्या अनुज्ञप्ती शुल्कामध्येही त्याच तारखेपासून त्याप्रमाणे वाढ करण्यात येईल व ती अनुज्ञप्ती धारकावर बंधनकारक राहील.

९) सदरची परवानगी ही जाहिरात फलक उभारणेसाठी बेसमेंटकरीता लागणारी जागा हा करारापुरतीच मर्यादित राहील. प्रत्यक्षात जाहिरात फलक लावणेसाठी बृहन्मुंबई महानगर पालिका यांची पूर्वपरवानगी घेणे आपणांस बंधनकारक राहील.

१०) जाहिरात फलक उभारणेकरीता परवानगी ही मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाच्या अधिन राहून देण्यात येत आहे. मा. उच्च न्यायालयाचे आदेशाचे पालन करणे आपणांस बंधनकारक राहील.

११) अनुज्ञप्ती धारकास प्रतिभूती ठेव(सेक्युरिटी डिपॉझिट) म्हणून एक वर्षाची अनुज्ञप्ती फी आगाऊ भरावी लागेल.

१२) सदर जागेवर जाहिरात फलक लावल्यावर कुठल्याही प्रकारचा वाद निर्माण झाल्यास परवानगी रद्द करण्याचे अधिकारी राखून ठेवण्यात येत आहे.

१३) सदरची परवानगी ही केवळ १ वर्षाकरीता देण्यात येत आहे. त्यानंतर अनुज्ञप्तीधारक नवीन परवानगी घेईल व त्यावेळी शासन/जिल्हाधिकारी जी अनुज्ञप्ती रक्कम निश्चित करेल त्याप्रमाणे येणारी अनुज्ञप्ती फी अनुज्ञप्ती धारक/आपणांस प्रतिवर्षी आगाऊ शासनास भरावी लागेल.

१४) शासनास सार्वजनिक हिताचे दृष्टीने जाहिरात प्रसिध्द करावयाची असल्यास, सदर जाहिरात फलक आपणांस मोफत उपलब्ध करुन द्यावे लागतील.

१५) उपरोक्त जाहिरात फलक लावणेपुर्वी पोलिस आयुक्त, ट्रैफीक यांची पुर्व परवानगी घ्यावी लागेल.

१६) जाहिरात फलक लावणेकरीता परवानगी दिलेल्या जागेची शासनास आवश्यकता लागल्यास अगर कोणतीही तक्रार प्राप्त झाल्यास, सदरची परवानगी रद्द करण्यात येईल व जिल्हाधिकारी/शासन यांनी नोटीस दिल्यापासुन सात दिवसाचे आत जाहिरात फलक आपणांस स्वखर्चाने काढुन टाकावे लागतील.

१७) जाहिरातीचे हक्क शासन/जिल्हाधिकारी यांच्या पुर्व परवानगीशिवाय अन्य कोणतीही व्यक्ती/संस्था यांना हस्तांतर करता येणार नाही. तसेच केल्यास शासन निर्णय दि.२१/११/१९५७ नुसार ७५% अनर्जित उत्पन्न शासनास अदा करणे बंधनकारक राहील.

१८) जाहिरातीचे फलक लावणाऱ्या कंपनीशी केलेल्या करारनाम्याची प्रत तसेच जाहिरातीचे फलक यांचेसबंधी लांबी, रुंदी उंची याबाबतची कागदपत्रे सादर करावीत.

१९) शासनास जाहिरात फलकास परवानगी देणेचे संदर्भात मार्गदर्शक तत्वांबाबत शासनास प्रस्ताव सादर केला आहे. त्यानुसार अटी/शर्ती शासन ठरविल त्या अटी/शर्ती अनुज्ञप्ती धारक यांना बंधनकारक राहतील.



Scanned by CamScanner

२०) जाहिरात फलकासाठी देण्यांत आलेल्या परवानगीमध्ये नमुद असलेल्या क्षेत्रामध्ये कोणताही बदल करता येणार नाही.

२१) बृहन्मुंबई महानगर पालिका अधिनियम १८८८ मोटार वाहन अधिनियम १९९८ यामधील तरतूदी आणि बृहन्मुंबई महानगर पालिकेने आखुन दिलेली मार्गदर्शक तत्त्वे यांचे आपण काटेकोरपणे पालन करावे. सदर तरतूदी अथवा मार्गदर्शक तत्त्वांचे अथवा या कार्यालयाचे अटी/शर्तींचे उल्लंघन झाल्याचे आढळल्यास सदरची परवानगी रद्द केली जाईल व जाहिरातीचे फलक स्वखर्चाने तात्काळ हटवावे लागतील.

२२) वरील अटी/शर्ती मान्य असल्याबाबतचे हमीपत्र रक्कम रु.२२०/- चे स्टॅम्प पेपरवर दोन दिवसात सादर करावे. तद्नंतर सदरची परवानगी कार्यान्वीत होईल.

मुळप्रतीवर मा. जिल्हाधिकारी यांची सही असे.

जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हाकरीता

प्रति,

मे. महाकाय आऊटडोर मिडीया प्रा.लि.,
ब-३०५, सिध्दि को-ऑप. हौसिंग सोसायटी लि.,
म्हाडा कॉलनी, ईस्टर्न एक्सप्रेस हायवे,
मुलूंड (पूर्व), मुंबई - ४०००८१.

**प्रत :** १) मा.प्रधान सचिव (मसहूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय यांना माहितीकरीता सविनय सादर.
२) मा. विभागीय आयुक्त कोंकण विभाय यांना माहितीकरीता सविनय सादर.
३) तहसिलदार बोरीवली / नगर भूमापन अधिकारी, गोरेगाव यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी रवाना.

मुळप्रतीवर मा. जिल्हाधिकारी यांची सही असे.

जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हाकरीता

Recd. 2/2/2013

क्र. : जमीन २६१४/प्र.क्र. २४/ज-३,

महसूल व वन विभाग,
जागतिक व्यापार केंद्र,
३२ वा मजला, कफ परेड,
मुंबई ४०० ००५.
दिनांक : १३ जून, २०१४.

विषय : जमिन : मुंबई उपनगर जिल्हा
मौजे आकुर्ली, ता. बोरीवली, न.भू.क्र.१४४/१ पैकी पश्चिम हायवे जवळ कांदिवली (पूर्व), येथील मोकळया जागेवर ४० फुट X ४० फुट (व्ही आकाराचा) जाहिरात फलक उभारण्यास मे. महाकाय आऊटडोअर मिडीया प्रा.लि. यांना परवानगी देण्याबाबत

शासन ज्ञापन : जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांना त्यांचे पत्र क्र. सी/ कार्या-३ डी/ कावि-७७/२०१२ / जा.क्र. ७३, दिनांक ३.२.२०१४, ला अनुलक्षून कळविण्यात येते की, शासन निर्णय, महसूल व वन विभाग, दिनांक ३.२.१९८८ मधील तरतुदीनुसार, जाहिरात फलकासाठी लागणा-या जमिनीकरीता निश्चित होणाऱ्या प्रचलित भाडेपट्टयाच्या चारपट इतकी अनुज्ञप्ती फी आकारुन, मे. महाकाय आऊटडोअर मिडीया प्रा.लि. यांना, मौ. आकुर्ली, ता. बोरीवली, न.भू.क्र. १४४/१ पैकी पश्चिम हायवे जवळ कांदिवली (पूर्व) येथील मोकळया जमिनीमध्ये ४०x४० फूट ( व्ही आकाराचा) एक जाहिरात फलक उभारण्यास शासनाने ,शासन ज्ञापन, महसूल व वन विभाग, क्र. जमीन-२६११/ ४२१/ प्र.क्र. १५९/ ज-३, दिनांक २३.२.२०१२ अन्वये मान्यता दिलेल्या जाहिरात फलकाचा अनुज्ञप्ती कालावधी, शासकीय जमिनीवरील जाहिरात फलक उभारण्याबाबतचे शासनाचे धोरण निश्चित होईपर्यंत किंवा दिनांक १.२.२०१४ पासून ३ वर्षे यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत वाढविण्यास खालील अटी व शर्तीवर याद्वारे शासनाची मान्यता देण्यात येत आहे:-

अटी व शर्ती :-

(१) जमिनीच्या प्रचलित बाजारमूल्य दर तक्त्याप्रमाणे ( Annual statements of rates) जमिनीच्या निश्चित होणा-या मूल्यांकनावर निश्चित होणाऱ्या भाडेपट्टयाच्या प्रचलित दराच्या (पीएलआरच्या) चारपट ( Four times) इतकी अनुज्ञप्ती फी आकारण्यात यावी.

(२) भाडेपट्टयाची अनुज्ञप्ती फी दर वर्षाच्या सुरुवातीस आगाऊ रक्कम म्हणून वसूल करण्यात यावी.

(३) प्रतिभूती ठेव (सिक्युरिटी डिपॉझिट) म्हणून एक वर्षाची अनुज्ञप्ती फी आगाऊ वसूल करण्यात यावी. मात्र त्यावर अनुज्ञप्ती धारकास व्याज देय राहणार नाही.

(४) दरवर्षी जमिनीच्या मूल्यांकनात वार्षिक बाजारमूल्य दर तक्त्याप्रमाणे होणारी वाढ विचारात घेऊन त्याप्रमाणे वाढीव अनुज्ञप्ती फी दर वर्षासाठी आकारण्यात यावी.

(५) जागेचा वापर मंजूर प्रयोजनासाठी करण्यात यावा. मंजूर प्रयोजनाव्यतिरिक्त जागेचा वापर करता येणार नाही.

(६) शासकीय जमिनीवर जाहिरात फलक लावण्यासंदर्भात निश्चित होणारे शासनाचे धोरण संस्थेस बंधनकारक राहील. याबाबतचे हमीपत्र जिल्हाधिकारी यांनी रु.२००/-च्या मुद्रांक कागदावर संस्थेकडून घ्यावे.

जिल्हाधिकारी, ... कार्यालय
दिनांक 17 JUN 2014
11892

Scanned by CamScanner

(७) जाहिरात फलक लावण्यापूर्वी तटीय क्षेत्र नियमांचे उल्लंघन होणार नाही, याकरीता आवश्यकतेनुसार संबंधित प्राधिकरणांची पूर्व परवानगी घेण्यात यावी. त्याचप्रमाणे बृहन्मुंबई महानगरपालिका, वाहतुक पोलीस तसेच इतर आवश्यक त्या प्राधिकरणांची परवानगी घेण्यात यावी व अशी परवानगी प्राप्त झाल्यानंतरच जाहिरात फलक उभारणीस मंजूर देण्याबाबतचे आदेश जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी निर्गमित करावेत. अर्जदार कंपनीस वरील सर्व परवानग्या मिळविण्यासाठी आवश्यक असलेले "ना हरकत प्रमाणपत्र" जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी द्यावे.

(८) प्रश्नाधिन जमिनीची मालकी शासनाची राहील व त्यावर अनुज्ञप्ती धारकाचा कोणत्याही प्रकारचा अधिकार राहणार नाही. तसेच शासनाच्या पूर्व परवानगी शिवाय जमिनीची विक्री/हस्तांतरण करता येणार नाही अथवा जमीन तारण ठेवता येणार नाही.

(९) जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचे पत्र क्र. सी/कार्या-३ डी/कावि-७७/२०१२, दिनांक २.२.२०१३ मधील अटी व शर्ती तसेच त्यांना योग्य वाटतील अशा इतर अटी व शर्ती.

(१०) वरील सर्व अटी बंधनकारक असल्याबाबत संस्थेने जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांच्याकडे रु.२००/- च्या मुद्रांक कागदावर हमीपत्र द्यावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( अ.ज्ञा.होमकर )
शासनाचे अवर सचिव

प्रति,

जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा,
प्रशासकीय इमारत, १० वा मजला,
वांद्रे (पूर्व), मुंबई -४०००५१

प्रतिलिपी :-

१) विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई
२) मे. महाकाय आऊटडोर मिडीया प्रा. लि. ब-३०५, सिध्दी को.ऑप.हौ. सो., इस्टर्न, एक्सप्रेस हायवे, मुलुंड (पूर्व), मुंबई-८१.
३) ज-३ कार्यासन (निवडनस्ती) महसूल व वन विभाग, जागतिक व्यापार केंद्र, ३२ वा मजला, कफ परेड, मुंबई-४०० ००५.

-------

Scanned by CamScanner

# जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा

क्र. :-सी/कायो-३डी/कावि-७७/५८/२०१४
दिनांक :- २३/०७/२०१४ 23 JUL 2014

वाचले :-

१) शासन महसूल व वन विभागाकडील ज्ञापन क्र.जमीन २६११/४२१/प्र.क्र.१५९/ज-३ दि.२३/०२/२०१२.
२) या कार्यालयाचे आदेश क्र.सी/कार्या-३डी/कावि-७७/२०११ दि. ०२/०२/२०१३.
३) शासन महसूल व वन विभागाकडील ज्ञापन क्र.जमीन २६१४/प्र.क्र.२४/ज-३ दि.१३/०६/२०१४.
४) मे.महाकाय आऊटडोअर मेडिया प्रा.लि. यांचे दि.२६/०६/२०१४ चे पत्र.
५) अनुज्ञापन अधिक्षक (प्र.), बृहन्मुंबई महानगरपालिका यांचे ना-हरकत पत्र क्र.अअ/७२६७/जाहिरात दि.२४/०७/२०१२.
६) महाराष्ट्र तटीय क्षेत्र प्राधिकरण अधिकारी यांचे पत्र क्र.CRZ-२०११/CR-३६/TC-३ दि.०१/१०/२०१२.
७) सह.आयुक्त वहातूक पोलीस मुंबई यांचे पत्र क्र.TPHQ/Plg/HRD११८/F.No.४५/illumination of Hording/Kandivali Tr.Dvn./०६/२०१४ दि.२१/०३/२०१४.

आदेश :-

मौजे आकुर्ली, तालुका बोरीवली, न.भू.क्र.१४४/१ पैकी पश्चिम हायवे जवळ कांदिवली (पूर्व) येथील मोकळया जमिनीमध्ये ४० फुट X ४० फुट ( व्ही आकाराचा) एक जाहिरात फलक उभारण्यास मे. महाकाय आऊटडोअर मिडीया प्रा.लि. यांना महाराष्ट्र जमीन महसूल ( सरकारी जमीन वितरण) नियम १९७१ मधील नियम ३४ मधील तरतुदीनुसार तसेच शासन निर्णय क्र.एलबीएस-२५८६/१७३६२९/प्र.क्र.२००/ग-८/ दि.३/०२/१९८८ मधील तरतुदीनुसार जाहिरात फलकासाठी लागणा-या जमिनीकरीता प्रचलित भाडेपट्टयाच्या प्रचलित मुल्यांकनाच्या चारपट इतकी अनुज्ञप्ती फी आकारुन शासकीय जमिनीवर जाहिरात फलक उभारण्यास उपद्घातील क्र.१ नुसार १ वर्ष अनुज्ञप्ती कालावधी करीता शासन अटी व शर्तीवर परवानगी देण्यात आली होती. त्या नुसार या कार्यालयाने उपोद्घातातील क्र.२ नुसार एक वर्षा करीता अनुज्ञप्ती फी रक्कम रु.३,०१,४१२/- अधिक प्रतिभूती ठेव (सिक्युरिटी डिपोझिट) म्हणून एक वर्षाची अनुज्ञप्ती फी रक्कम रु३,०१,४१२/- अशी एकूण रक्कम रु.६,०२,८२४/- वसूल करुन मान्यता देण्यात आली होती. सदर एक वर्ष अनुज्ञप्तीचा कालावधी दि.०१.०२.२०१४ रोजी संपुष्ठात आल्याने, पुढील अनुज्ञप्ती कालावधी वाढवून मिळण्याची विनंती कंपनीने शासनास केली होती.

प्रकरणी शासनाने उपोद्घातातील क्र.३ चे शासन ज्ञापनानुसार दि.०१/०४/२०१४ रोजी संपुष्ठात आलेला जाहिरात फलकाचा अनुज्ञप्ती कालावधी, शासकीय जमिनीवरील जाहिरात फलक उभारण्याबाबतचे शासनाचे धोरण निश्चित होईपर्यंत किंवा दि.०१/०२/२०१४ पासून पुढील ३ वर्ष यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत वाढविण्यास अटी व शर्तीवर मान्यता दिली आहे. तसेच जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांना योग्य वाटतील अशा इतर अटी व शर्तीवर परवानगी दिलेली आहे.

जिल्हाधिकारी,मुंबई उपनगर यांचे कार्यालय,प्रशासकिय इमारत १०वा मजला,शासकियवसाहत,बांद्रा(पूर्व)मुंबई ५१
कार्यालय९१-२६५५६७९९/२६५५७८०७फॅक्स २६५५६८०५ इमेल mumbaisuburbancollector@mah.gov.in



Scanned by CamScanner

त्याप्रमाणे शासनाने दि.१३/०६/२०१४ चे ज्ञापनात नमुद केल्यानुसार जाहिरात फलक लावण्यापूर्वी तटीय क्षेत्र प्राधिकरणांची, बृहन्मुंबई महानगरपालिका व वाहतुक पोलीस तसेच अन्य आवश्यक त्या प्राधिकरणांची परवानगी प्राप्त झाल्यानंतर जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांनी शासनाने दिलेल्या परवनगीनुसार अटी व शर्तीवर जाहिरात फलक उभारण्यास परवानगी दयावी. त्यानुसार मे. महाकाय आऊटडोअर मिडीया प्रा.लि. यांनी दि.२६/०६/२०१४ चे पत्राने आवश्यकत्या परवानग्या करुन अशी विनंती केली की, कंपनीने या पूर्वी शासनास प्रतिभूती ठेव (सिक्युरिटी डिपोझिट) म्हणून अदा केलेली रक्कम रु ३,०१,४१२/- ही शासनाकडे जमा असल्याने, मुदतवाढी बाबत शासन ज्ञापन दि.१३/०६/२०१४ नुसार पुन्हा प्रतिभूती ठेव रक्कम आकारतांना, या अगोदर शासनाकडे जमा असलेल्या रक्कमेचा विचार करणेत येऊन ती समायोजित करणेत यावी.

सबब, उपोद्घातातील अनु. क्र.१ चे ज्ञापनातील अटी व शर्तीस अधिन राहून मौजे आकुर्ली, तालुका बोरीवली, न.भू.क्र.१४४/१ पैकी पश्चिम हायवे जवळ कांदिवली (पूर्व) येथील मोकळया जमिनीमध्ये ४० फुट X ४० फुट ( व्ही आकाराचा) एक जाहिरात फलक उभारण्यास मे. महाकाय आऊटडोअर मिडीया प्रा.लि. यांना शासकीय जमिनीवरील जाहिरात फलक उभारण्याबाबतचे शासनाचे धोरण निश्चित होईपर्यंत किंवा दि.०१/०२/२०१४ पासून ३ वर्ष यापैकी जे अगोदर घडेल तो पर्यंत अनुज्ञप्ती कलावधी वाढविण्यास खालील अटी व शर्तीवर मंजुरी देण्यात येत आहे.

**अटी / शर्ती :**

१) उपोद्घातातील क्र.२ चे आदेशाअन्वये एक जाहिरात फलक लावण्याकरीता १४.८६ चौ.मी. क्षेत्राकरीता जमीनीच्या प्रचलित भाडेपट्टयाच्या प्रचलित मुल्यांकनाच्या ४ पट इतकी वार्षिक अनुज्ञप्ती फी ची रक्कम **रु.३,०१,४१२/-** प्रतिभूती ठेव (सिक्युरिटी डिपॉझिट) म्हणून या पूर्वी कंपनीने शासन केलेली आहे. सदर रक्कमेतून शासन ज्ञापन दि.१३/०६/२०१४ नुसार येणारी अनुज्ञप्ती फी ची रक्कम **रु.२,६७,९४९/-** वजा जाता (३०१४१२ - २६७९४९) शिल्लक रक्कम रु. ३३,४६३/- राहते. सदर शिल्लक राहिलेली रक्कम हि एक वर्षाची अनुज्ञप्ती फी म्हणुन वसुल करावयाचे प्रतिभूती ठेवी मधुन म्हणजे रक्कम **रु. २,६७,९४९/-** मधुन वजा जाता (२,६७,९४९ - ३३,४६३) शिल्लक राहणारी प्रतिभुतीची ठेव म्हणुन रक्कम **रु.२,३४,४८६/-** पे-ऑर्डर व्दारे **Collector, Mumbai Suburban District** यांचे नांवे काढून सात दिवसात या कार्यालयात जमा करावी.

२) जाहिरात फलकाचा अनुज्ञप्ती कालावधी दि.०२/०२/२०१४ पासून ३ वर्ष किंवा शासकीय जमिनीवरील जाहिरात फलक उभारण्याबाबतचे शासन धोरण निश्चित होई पर्यंत या पैकी जे अगोदर घडेल इतका असेल.

३) अनुज्ञप्ती फी हि दर वर्षाच्या सुरुवातीस आगाऊ रक्कम म्हणून या कार्यालयात जमा करावी.



Scanned by CamScanner

237

४) मंजूर जागेचा वापर केवळ जाहिरात फलक उभारण्याकरीता करण्यात यावा. मंजूर प्रयोजनाव्यतिरिक्त जागेचा वापर करण्यात येवू नये.

५) जाहिरात फलकाचे क्षेत्रा करीता आकारण्यात येणारी अनुज्ञप्ती फी हि दरवर्षाचे जमिनीच्या वार्षिक बाजारमूल्य दर तक्त्या प्रमाणे होणारी वाढ विचारात घेऊन त्याप्रमाणे आकारण्यात येईल.

६) जाहिरात फलक उभारण्याबाबत अनुज्ञापन अधीक्षक, बृहंन्मुंबई महानगरपालिका याचे ना-हरकत पत्र १५ दिवसात या कार्यालयात सादर करावे.

७) या कार्यालयाचे आदेश क्र.सी /कार्या-३डी/कावि-७७/२०१२ दि.०२/०२/२०१३ मधील अट क्र.४ ते २१ अनुज्ञप्ती धारकास बंधनकारक राहतील.

८) वरील अटी/शर्ती मान्य असल्याबाबतचे तसेच शासकीय जमीनीवर जाहिरात फलक लावण्यासंदर्भात निश्चित होणारे शासनाचे धोरण कंपनीस बंधनकारक राहील. असे लिखित "हमीपत्र" रक्कम रु .२२०/- चे स्टॅम्प पेपरवर दोन दिवसात सादर करावे. तद्नंतर सदरची परवानगी कार्यान्वीत होईल.

मूळप्रतीवर मा. जिल्हाधिकारी यांची सही आहे.

सही/- २१/०५/१४

जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हाकरीता

प्रति,

मे. महाकाय आऊटडोर मिडीया प्रा.लि.,
ब-३०५, सिध्दि को-ऑप. हौसिंग सोसायटी लि.,
म्हाडा कॉलनी, इस्टर्न एक्सप्रेस हायवे,
मुंलूंड (पूर्व), मुंबई - ४००० ८१.

प्रत : १) मा.प्रधान सचिव (महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय यांना माहितीकरीता सविनय सादर.

२) मा. विभागीय आयुक्त कोकण विभाय यांना माहितीकरीता सविनय सादर.

३) अनुज्ञापन अधीक्षक, अनुज्ञापन खाते, बृहंन्मुंबई महानगरपालिका, श्री.छत्रपती शिवाजी महाराज मंडई इमारत, ४ था मजला, माता रमाबाई आंबंडेकर मार्ग, मुंबई- १ यांचेकडे रवाना.

२/- त्यांनी पत्र क्र.अअ/७२६७/जाहिरात दि.२४/०७/२०१२ नुसार पुढील योग्य ती कार्यवाही करावी.

३) तहसिलदार बोरीवली / नगर भूमापन अधिकारी, गोरेगाव यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी रवाना.

मूळप्रतीवर मा. जिल्हाधिकारी यांची सही आहे.

सही/- २१/०५/१४

जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हाकरीता

प्राप्त ५/५/१४

(M. B. Gua)
Mahakay Outdoor Media.